ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I | ISSUE-II | JULY | 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांवर दूरचित्रवाणीद्वारे प्रसारित होणा-या शैक्षणिक कार्यक्रमांचा अभ्यास

**श्री-सुधीर बबनराव वरबडे (भूमकर)**
**सहाय्यक प्राध्यापक**
अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर

## १.प्रस्तावनाः-

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा समजला जातो. शिक्षणामध्ये औपचारिक अनौपचारिक व सहज शिक्षणाचा समावेश केला जातो. विद्यार्थ्याच्या शिक्षणावर कुटुंब, समाज परिस्थिती, वातावरण, शाळा, मित्रपरिवार इ. चा परिणाम होत असतो. याबरोबरच वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन या प्रसारमाध्यमांचा देखील बरावाईट परिणाम होत असतो. विशेषताः कुमारावस्थेतील म्हणजेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे मन हे अतिसंवेदनशील असते. ही मुले अनुकरणातून, संस्कारातून शिकत असतात. विद्यार्थ्यांच्या मनावर सर्वच चांगल्या आणि वाईट गोष्टीचा परिणाम होत असतो. तंत्रज्ञानाच्या अत्यंतिक प्रगतीमुळे दूरचित्रवाणी ही घराघरात पोहोचली आहे. या दूरचित्रवाणीवर विविध वाहिण्या पहावयास मिळतात. या दृकश्राव्य माध्यमामुळे विद्यज्ञर्थ्यांवर देखील खुप मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. या दूरचित्रवाणीमुळे वाचन लेखन, चर्चा कमी होवून मुले तासनतास टेलिव्हिजनच्या सेट समोर बसलेली दिसतात. कुमारावस्थेतील मुले याबाबत जास्तच अग्रणी असतात. कुमारावस्थेलाच पौगंडावस्था, धांदलीची अवस्था एवढेच नव्हे तर पूनर्जन्माची अवस्था देखील म्हटले जाते. ही अवस्था ख-या अर्थाने वळण लावण्याची, सुसंस्कार करण्याची, शिक्षण घेण्याची अवस्था असते. या अवस्थेतील विद्यार्थ्यांवर प्रसारमाध्यमातील दृकश्राव्य अशा दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांच्या कार्यक्रमांचा निश्चितच अनुकूल, प्रतिकुल परिणम होत असतो.

आजच्या युगाला संगणकीय, तंत्रज्ञानयुग, स्पर्धेचे युग असे जरी आपण म्ळणत असलो तरी या युगाचा पाया १६ व्या शतकातील इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीने घातला. या क्रांतीपासून अनेक शोध लागले त्यातलाच एक शोध म्हणजे 'दूरचित्रवाणी' हे प्रसारमाध्यम होय. कोणताही शोध किंवा कोणतेही तंत्रज्ञान हे त्याचा आपण कसा उपयोग करुन घेतो यांवर त्याचा परिणाम ठरत असतो. दूरचित्रवाणीचेही तसेच आहे. याचा योग्य उपयोग जर आपण केला तर ते फायद्याचे आहे. मात्र त्याचा अतिरेक केला किंवा योग्य पद्धतीने व प्रमाणात उपयोग केला नाही तर त्याचा विपरित परिणाम होणारच वैचारिक जडण घडणीतील काही घटक दृश्य असतात. तर काही घटक अदृश्य असतात. काहींचा प्रत्यक्ष प्रभाव पडतो तर काहींचा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. जनसंवाद साधने त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत

असतात. या जनसंवाद माध्यमातील महत्वाचे माध्यम म्हणजे दूरचित्रवाणी होय. या दूरचित्रवाणीचा आजचे विद्यार्थी म्हणजे उद्याचे नागरिक यांच्यावर नेमका काय परिणाम होतो. त्यांच्या अध्ययनावर, अभ्यासावर, व्यक्तिमत्वावर नेमका काय परिणाम होतो. दूरचित्रवाणीचा उपयोग कसा करवून घ्यावा कितपत व कशासाठी करावा हे पाहण्यासाठी तपासण्यासाठी दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रमांचा लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांवर काय? कसा परिणाम होतो याचा अभ्यास करण्यासाठी सदरील समस्या निवडली आहे.

## २.समस्या विधान:-

**"लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांवर दूरचित्रवाणीद्वारे प्रसारित होणा-या शैक्षणिक कार्यक्रमांचा अभ्यास."**

## ३.संशोधनाची उद्दिष्ट्ये:-

१. लातूर जिल्ह्यातील दूरचित्रवाणी या प्रसारमाध्यमाच्या प्रसाराचा अभ्यास करणे.
२. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील (इयत्ता ९ वी व १० वी) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत दूरचित्रवाणीद्वारे प्रसारित होणा-या शैक्षणिक कार्यक्रमांचे योगदान तपासणे.
३. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यावर दूरचित्रवाणीच्या शैक्षणिक कार्यक्रमांचा होणार परिणाम तपासणे.
४. दूरचित्रवाणीवरील विविध वाहिन्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणारा परिणाम तपासणे.
५. माध्यमिक शाळेतील कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांच्या दूरचित्रवाणी या प्रसारमाध्यमाकडूनच्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

## ४.परिकल्पना:-

**सं**शोधना समस्येच्या उत्तरापैकी संशोधकाला जास्तीत जास्त योग्य वाटणारे उत्तर म्हणजे परिकल्पना होय.७

१. दूरचित्रवाणीवरील विविध वाहिन्यांचे शैक्षणिक कार्यक्रम पाहिल्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययनास मदत मिळते.
२. दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे सूप्त कला गुण विकसित होतात.
३. उद्बोधनपर, मुल्यशिक्षणावर आधारित कार्यक्रम विद्यार्थ्यांना दाखवल्यामुळे सुसंस्कृतपणा व वैचारिक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते.
४. शैक्षणिक कार्यक्रम नियमित पाहिल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य दिशा मिळते व त्याचा अभ्यासासाठी चांगला उपयोग होतो.

**५.संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-**

**व्याप्ती:-**

सदरील संशोधनामध्ये विद्यार्थी, शाळा, वाहिन्या त्यांचे कार्यक्रम इ. संदर्भात व्याप्ती पुढील प्रमाणे आहे.

**शाळा :-**

या संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण शाळेच्या १०% शाळांची निवड करण्यात आलेली आहे.

**विद्यार्थी:-**

लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळात (९ वी १० वी) या वर्गात शिक्षण घेणा-या जवळपास ८७००० हजार विद्यार्थ्यांपैकी निवडलेल्या १० शाळेतील ५ विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

**संशोधनाची व्याप्ती:-**

सदरील संशोधनाची व्याप्ती ही लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील २००८-२०१० या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचाच यामध्ये विचार होणार आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील २००८-२०१० पर्यंतच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांवर दूरचित्रवाणीच्या शैक्षणिक कार्यक्रमाचा अभ्यास इथपर्यंतच व्याप्ती आहे.

**६.वाहिन्यांची मर्यादा:-**

दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्याद्वारे शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करणा-या वाहिन्यांचा विचार केला जाणार आहे.

**७.संशोधनाचे महत्त्व:-**

विद्यार्थी संशोधनामुळे दूरचित्रवाणीच्या प्रभावी माध्यमाचा माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कसा उपयोग करुन द्यायचा याची दिशा मिळेल. व अध्ययन प्रभावी होण्यासाठी, अभ्यासासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी याचा फायदा करुन घेता येईल. तसेच दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रम पाहणे उपयोगीच आहे. मात्र काय पाहायचे, किती वेळ पाहायचे हे ठरवणे गरजेचे आहे. या दृष्टीने संशोधन महत्त्वाचे वाटते.

**शिक्षक:-**

शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी नेमाने कोणते कार्यक्रम उपयोगाचे आहेत विविध शैक्षणिक कार्यक्रम ते दाखवल्यानंतर त्यांच्यावर अनुकूल परिणाम होऊ शकतो तसेच अध्ययन अनुकूल परिणाम होवू शकतो यासाठी या संशोधनाचे महत्त्व वाटते.

**पालक:-**

कोणता शोध हा उपयोगाचाच असतो मात्र त्याचा उपयोग करुन कसा घ्यायचा याचे तंत्र महत्त्वाचे आहे हे तंत्र पालकांना उपयोगी पडणार आहे.

**समाज:-**

समाजाल काही मार्गदर्शक, दिशादर्शक बाबी दूरचित्रवाणीमुळे मिळतात हे समजले तर दूरचित्रवाणीचे अनिष्ठ परिणाम टाळता येतील.

**शाळा:-**

दूरचित्रवाणी हे अनौपचारिक शिक्षणाचे सर्वात मोठे माध्यम आहे. व जे शाळा मधून शिकवता येते तसेच शाळेमधून येत नाही ते म्ळणजेच औपचारिक अनौपचारिक, शालेय-सहशालेय, अभ्यासाउपयोगी, अभ्यास पुरक अशा विविध कार्यक्रमाचा उपयोग कसा करुन घ्यायचा यासाठी फायद्याचे ठरेल.

**८.संशोधनाची साधने:-**

- विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरले जाणार आहे.
- पालकांसाठी मतावली हे साधन वापरले जाणार आहे.
- शिक्षण क्षेत्रातील नामांकित व्यक्तिंसाठी मुलाखत हे साधन वापरले जाणार आहे.
- संख्याशास्त्रीय साधनामध्ये मध्यमान व शेकडेवारी व इतर संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला जाणार आहे.

**९.न्यादर्श पद्धती:-**

"जनसंख्येच्या तथ्याविषयी पुर्वानुमान करण्याकरिता जनसंख्येतून निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान संचाला न्यादर्श म्हणतात."

न्यादर्शामध्ये लातूर जिल्ह्यातील जवळपास ८८४० शाळांपैकी १०% निवडलेल्या माध्यमिक शाळेतील एकुण विद्यार्थ्यांपैकी ५% विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. निवडलेल्या शाळेतील २% शिक्षकांची निवड करण्यात येणार आहे तर पाल्यांच्या २% पालांकची निवड करण्यात येणार आहे.

**१० .निष्कर्ष:-**

१. दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम सर्वच विद्यार्थी पाहतात.

२. दूरचित्रवाणीचे केबल नेटवर्क किंवा छिश ॲन्टिना यांचेच बहूतांश प्रेक्षकांकडे नेटवर्क आहे.

३. दूरचित्रवाणी चे कार्यक्रम पाहाण्यापाठीमागे ज्ञान/माहिती मिळवणे व मनोरंजन हिच उद्दिष्टे आहेत.

४. दूरचित्रवाणीवरील औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम बहुतांश विद्यार्थी पाहातात.

५. अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्रम सर्वच विद्यार्थ्यांना आवडतात.

६. वर्गातील अध्यापन व दूरचित्रवाणीवरील अध्यापन यामध्ये निश्चित असा फरक वाटतो.

७. दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रमामुळे ज्ञानात्मक क्षेत्रावर जास्त परिणाम होतो.

८. विद्यार्थ्यांना दूरचित्रवाणीवरील हिन्दी भाषेतील कार्यक्रमच जास्त आवडतात.

९. दूरचित्रवाहिनीच्या विविध वाहिन्यावरील अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद आहे.

१०. दूरचित्रवाहीनी वरील औपचारिक शैक्षणिक कार्यक्रमाचा शिक्षणावरील औपचाकि शैक्षणिक कार्यक्रमाचा शिक्षणामध्ये अध्ययनासाठी व अभ्यासासाठी फायदाच होतो.

११. दूरचित्रवाहिनीवरील औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम वाढवले पाहिजेत व ते सायंकाळी प्रक्षेपित केले जावेत.

१२. व्यावसायीक/खाजगी वाहिन्यांनी देखील औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम दाखवले पाहिजेत.

## ११.शिफारशी

१. सह्याद्री वाहिनीवरील औपचारिक शैक्षणिक कार्यक्रमाची वेळ वाढवावी.

२. औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम पुन्हा प्रक्षेपित करावेत म्हणजे सर्व विद्यार्थ्यांना फायदा होईल.

३. शासनाने व्यावसायीक वाहिन्याना औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करणे बंधनकारक करावे. म्हणजे याचा फायदा विद्यार्थ्यांना होइल.

४. दूरचित्रवाणीवरील अनौपचारिक शिक्षणाशी संबंधित असलेले कार्यक्रम विद्यार्थ्यांनी पाहण्यासंबंधी पालकांनी दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा.

५. अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्रमादरम्यान अश्लिल जाहिराती दाखवू नयेत.

६. विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी किंवा हितासाठी शासनाने दूरचित्रवाहिनी वरील कार्यक्रम शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दाखवण्याची सोय करावी.

## संदर्भ ग्रंथ

१.साळुंके कविता,महाले संजीवनी शालेय व्यवस्थापन,य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक.

२.मुळे रा.श., उमाठे वि.तु. १९९८शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे,विद्याबुक प्रकाशन, औरंगाबाद

३.भितांडे वि.स. २००६ शैक्षणिक संशोधन पद्धती,नूतन प्रकाशन, नागपूर

४.दुनाखे अरविंद (२००६)शालेय व्यवस्थापन, प्रशासन, संघटन व नियोजन, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

५.पारसनिस न.रा. (२००२)प्रशिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे.

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com